MHPA220000832026

**पालम येथील दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)**

===============================

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७/२०२६**

**निशाणी १ वरील आदेश**
**(जाहीर दिनांक – ०८/०५/२०२६)**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे, गंगुबाई वामनराव मुलगीर यांचे दि.२६/११/२०२२ रोजी मौजे पेठपिंपळगाव, ता. पालम, जि.परभणी येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र. १ हा मयताचा पुतण्या व अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे नातु आहेत. मयत गंगुबाई ह्या अविवाहीत होत्या. तसेच मयताचा भाऊ धोंडीबा मुलगीर व दुसरा पुतण्या सुधाकर मुलगीर हे अनुक्रमे दि.२९/०८/२०२५ व दि. २५/०४/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. मयत गंगुबाई यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय व इतर महसुलीकामासाठी मयत गंगुबाई यांचे वारस म्हणून नोंदणी करणेसाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी, अर्जदाराच्या मागणी विषयी हरकती मागवणेत आल्या त्याप्रमाणे 'देशोन्नती' या वर्तमानपत्रामध्ये दि.२१/०२/२०२६ रोजी जाहीर नोटिस प्रसिध्द करणेत आली व अर्जदार यांच्या मागणीबाबत कोणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन तसा नोंदवावा असे कळविण्यात आले. परंतु, सदरची जाहीर नोटिस प्रसिध्द होवूनही अद्यापपर्यंत कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही. सदर जाहीर नोटीस प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राची अस्सल प्रत (नि.१६) याकामी दाखल केलेली आहे. तद्नंतर दिवाणी न्यायालय, पालम ता.पालम जि. परभणी तसेच ग्रामपंचायत पेठपिंपळगाव, ता.पालम, जि. परभणी यांचे सुचना फलकावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. जाहीर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द करून कोणीही याकामी हजर होवून अर्जदार यांचे अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

**४.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ अर्जदार क्र. १ चे शपथपत्र (नि.११) दाखल केले आहे व आपल्या अर्जातील कथनांची पुनरावृती केली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या कथनांना पुष्टी देण्याकरीता मयत गंगुबाई, धोंडीबा व सुधाकर यांच्या मृत्यु दाखल्यांची स.शि. प्रती (नि.१२ ते १४) व त्याच्या स्वतःच्या आधारकार्डची प्रत (नि.१५) दाखल करून नि.१७ कडील पुरसीसने त्यांचा पुरावा बंद केला आहे.

**५.** मी अर्जदारांच्या वतीने श्री. एफ. डब्ल्यु. शेख यांचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**६.** अर्जदारांचा अर्ज, अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि त्यांचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात, व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | **अर्जदार यांचे मागणी प्रमाणे ते मयत गंगुबाई वामनराव मुलगीर यांचे वारस असलेचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ?** | **होय.** |
| २. | **आदेश काय ?** | **अर्ज मंजूर करण्यात येतो** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीताः–**

**७.** अर्जदार यांनी अर्जातील कथनांच्या शाबीतीकरीता अर्जदार क्र. १ यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.११) दिले आहे. सदर सरतपासामध्ये त्यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. त्यांनी अर्जाचे सुसंगत पुरावा दिलेला आहे. नि.१२ कडील मृत्यु दाखल्याचे अवलोकन केले असता गंगुबाई ह्या दि.२६/११/२०२२ रोजी मयत झाल्या असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात तसेच नि. ११ कडील सरतपासाचे शपथपत्रात मयत गंगुबाई ह्या अर्जदार क्र. १ ची आत्या व अर्जदार क्र. २ व ३ यांची आजी असल्याचे कथन केले आहे. तसेच मयत गंगुबाई यांना अर्जदार हेच सरळ व कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत अशी कथने केली आहेत. अर्जातील कथने अद्यापपर्यंत कोणीही आव्हानीत केलेली नाहीत. त्यामुळे ती कथने अबाधित राहिली आहेत.

८. एकंदरीत अभिलेखातील कागदपत्रे ही अर्जदार यांनी त्याचे अर्जात केलेल्या कथनांना पुष्टी देतात. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून अर्जदार यांचे कथनांवर विश्वास ठेवू नये असा कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. जाहीरनामा व जाहीर नोटीस प्रसिध्द करूनही याकामी अर्जदार यांचे कथनांस कोणीही विरोध दर्शवून ती आव्हानीत केलेली नाहीत. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार हे मयत गंगुबाई यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. यास्तव अर्जदार यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीताः–</u>**

९. वर नमुद केलेल्या विवेचनावरून मी मुद्दा क्र. २ मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. **अर्जदार क्र. १ प्रदीप धोंडिबा मुलगिर, अर्जदार क्र. २ रूक्माजी सुधाकर मुलगिर व अर्जदार क्र. ३ गुलाब सुधाकर मुलगिर** हे मयत **गंगुबाई पि. वामनराव मुलगीर** यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship certificate) त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर देण्यात यावा.

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.05.08 16:23:01 +0530

**दिनांक – ०८/०५/२०२६**

**(मनिषा म. पाटील)**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पालम.**